दाखल तारीख : ०८.१०.२०१३
नोंदणी तारीख : ०९.१०.२०१३
निकाल तारीख : २१.०४.२०१६
कालावधी : ०२ व. ०६म. १२दि.

**३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, निलंगा यांचे न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी शौकत एस. गोरवाडे )

नियमित दिवाणी दावा क्र.३९३/२०१३ नि.क्र.

विद्यावती किरण पाटील,
वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम,
रा. चिंचकोट ता.उमरगा जि.उस्मानाबाद. ...... वादी

**विरूध्द**

१) माधव रामराव पाटील,
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती,

२) अनिता माधवराव पाटील,
वय : ४५ वर्षे, धंदा : घरकाम,

३) संदेश माधवराव पाटील,
वय : १५ वर्षे,

४) योगेश माधवराव पाटील,
वय : १३ वर्षे,
प्रतिवादी कं.३ व ४ यांची अ.पा.क.आई
प्रतिवादी कं.२ अनिता माधवराव पाटील.

५) रसिकाबाई रामराव पाटील,
वय : ७५ वर्षे, धंदा : घरकाम,
सर्व रा. हालसी हात्तरगा ता.निलंगा जि. लातूर. ..... प्रतिवादी

**दावा :-** सरस-निरस मानाने वाटणी होऊन वादीस १/३ हिस्स्याचा पृथक:ताबा मिळणेबाबत.

.......................................................................................

वादीतर्फे विधिज्ञ :- श्री. एम.एस.सलगर,
प्रतिवादी कं.१ तर्फे :- एकतर्फा
प्रतिवादी कं.२ ते ५ तर्फे विधिज्ञ :- जे. व्ही. धुमाळ

.......................................................................................

.

**न्यायनिर्णय**
(अधिघोषणा दिनांक २१ एप्रिल, २०१६)

१. वादीने प्रस्तुतचा दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत दाव्यातील वादीचे कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :-

मौजे हालसी हात्तरगा ता. निलंगा जि.लातूर येथील जमीन गट कं.५८ क्षेत्र ०७ हे. ४९ आर ही जमीन या दाव्याचा विषय असून तिला येथून पुढे ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात आले आहे.

३. प्रस्तुत दाव्यातील वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :

प्रतिवादी कं.२ ही प्रतिवादी कं.१ ची पत्नी असून प्रतिवादी कं. ३ व ४ ही प्रतिवादी कं. १ ची मुले आहेत. प्रतिवादी कं.१ हा वादीचा भाउ असून प्रतिवादी कं.५ आई आहे. वादी व प्रतिवादी कं.१ चे वडिल व प्रतिवादी कं.५ चे पती रामराव पाटील हे मयत झाले आहेत.

४. दावा मिळकत ही वडिलोपार्जीत एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत असून तिचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी कं.१ ने वडिलांच्या मृत्युनंतर वादीचे नाव सातबारा पत्रकी वारस म्हणून नोंदविले नाही. तसेच वादीने दावा मिळकतीचे वाटप मागितले असता, प्रतिवादींनी ते नाकारले या कारणाने वादीने प्रस्तुतचा वाटपाचा दावा दाखल केला आहे.

५. प्रतिवादी कं.५ यांनी त्यांची कैफियत (नि.कं.१९) दाखल करून वादीचा दावा मंजूर करण्याची विनंती केली आहे. याउलट, प्रतिवादी कं. १ ते ४ यांनी त्यांची कैफियत (नि.कं.३०) दाखल करून नातेसंबंधा व्यतिरिक्त दाव्यातील कथने अमान्य केली आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकत त्यांची स्वतंत्र मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे कथन करून वादी व प्रतिवादी कं.१ चे वडिल रामराव जिवंत असतांना सुमारे २० ते २२ वर्षापुर्वी प्रतिवादी कं.१ व त्यांच्या मध्ये हालसी येथील सर्व्हे कं. ५८ व ८९ या

जमिनीची १९८७ साली वाटणी झाली असल्याचे व त्या वाटणीने सर्व्हे कं. ८९ ची जमीन रामराव तर दावा मिळकत सर्व्हे कं.५८ प्रतिवादी कं.१ च्या हिस्स्यास आल्याचे नमूद करून वादीस दावा मिळकतीमध्ये हक्क नसल्याने व प्रतिवादींनी दावा मिळकत नोंदणीकृत वाटणी पत्राने त्यांच्यामध्ये वाटणी करून घेतली असल्याने देखील दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. वादीतर्फे वकिल श्री. एम. एस. सलगर आणि प्रतिवादींतर्फे वकिल श्री. जे.व्ही. धुमाळ यांचा युक्तिवाद ऐकला. दावा, कैफियत व पुरावा वाचला. कागदपत्रांचे अवलोकन केले. माझे पुर्वाधिका-यांनी मुद्दे (नि.कं. ३३) काढले असून ते खालील प्रमाणे नमूद करून त्यांचा सकारण निष्कर्ष पुढिलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.कं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी, दावा मिळकत वडिलार्जित असल्याचे सिध्द करतात काय? | : | होय |
| २ | वादी, दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे काय? | : | होय |
| ३ | वादीला दावा मिळकतीमध्ये <u>१/३</u> हिस्सा मिळण्यास वादी पात्र आहेत काय? | : | १/९ हिस्सा |
| ४ | प्रतिवादी कं.१ ते ४ मिळकतीचे वाटप पुर्वी प्रतिवादी कं.१ व त्याच्या वडिलांमध्ये झाल्याचे सिध्द करतात काय? | : | नाही |
| ५. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय? | : | दावा खर्चासह मंजूर |

## <u>कारणमिमांसा</u>

७. ***<u>वादीने खालील साक्षीदारांचा पुरावा नोंदविलेला आहे.</u>***

वा.सा.कं.१ विद्यावती किरण पाटील (नि.कं.३६)

वा.सा.कं.२ गुरूलिंग मडोळी स्वामी (नि.कं.३९),

८. वादीने खालील कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे.

१. दावा मिळकत गट क्रं.५८ चा सातबारा उतारा (नि.क्रं.०६)

९. प्रतिवादी क्रं.२ अनिता यांनी त्यांचे शपथपत्र (नि.क्रं.५१) दाखल केले असून फेरफार क्रं.४६० (नि.क्रं.५४) व खरेदीपत्र (नि.क्रं.५७) या कागदपत्राचा आधार घेतलेला आहे.

**मुद्दा क्रं. १ व ४ करीता** :-

१०. वा.सा.क्रं.१ विद्यावती यांनी त्याच्या सरतपासामध्ये त्यांचे वडिल रामराव यांना हालसी या गावी गट क्रं.५८ व गट क्रं.८९ या दोन मिळकती होत्या, त्यापैकी गट क्रं.८९ ही मिळकत रामराव यांनी त्यांच्या हयातीमध्ये एकत्र कुटूंबाच्या गरजेकरीता विक्री केली असल्याने केवळ गट क्रं. ५८ ही दावा मिळकत एकत्र कुटूंबाची असल्याने त्याबाबत दावा दाखल करून प्रतिवादींकडे हिस्सा मागितल्याचे कथन केले आहे. वा.सा.क्रमांक १ विद्यावती यांनी दावा मिळकतीचे अद्याप वाटप झाले नसल्याचे देखील सरतपासात नमूद केले आहे. सदर साक्षीदाराने तिच्या उलटतपासात गट क्रं. ८९ ही जमिन एकत्रात असतांना विक्री केली आहे हे मान्य करून सदरची मिळकत रामराव यांना वाटप होवून आल्यानंतर त्यांनी विक्री केल्याचे त्यांनी नाकारले आहे.

११. वा.सा.क्रं.२ गुरूलिंग यांनी देखील दावा मिळकती व्यतिरिक्त गट क्रं.८९ ही मिळकत एकत्र कुटूंबाच्या गरजेकरीता रामराव यांनी विक्री केल्याचे नमूद करून प्रतिवादींनी वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा नाकारल्यामुळे वादीने दावा दाखल केल्याचे नमूद केले आहे. सदर साक्षीदाराने रामराव पाटील यांचा मृत्यु भुकंपानंतर दोन तीन वर्षांनी झाला व रामराव यांनी १५ ते १६ वर्षापुर्वी विक्रीचा व्यवहार केला असे कथन केले

आहे.

१२. प्र.सा.क्रं.१ अनिता यांनी त्यांच्या सरतपासामध्ये वादीचे वडिल रामराव पाटील हे सन-२००५ पुर्वी मयत झाले आहेत तसेच वादीचे लग्न सन-१९९४ पुर्वी झाले असल्याने वादीला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मागता येत नाही हा मुख्य बचाव घेवून सर्व्हे क्रं.८९ रामराव यांना वाटप होवून मिळाली होती व त्यांनी संजीव नागेराव पाटील यांना कायदेशीर गरजेपोटी विक्री केली आहे, त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ यांना वाटपामध्ये आलेली सर्व्हे क्रं.५८ मधील जमीन त्यांच्या स्वतंत्र मालकीची असल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात तिचे सासरे रामराव यांनी एकत्रीत असतांना दवाखान्याचा झालेला खर्च व इतर खर्चासाठी जमिन विक्री केल्याचे नमूद करून शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याने काही जमीन तिचे पती प्रतिवादी क्रं.१ च्या नावाने केल्याचे कथन केले आहे.

१३. फेरफार क्रं.४६० (नि.क्रं.५४) चे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्रं.१ यांनी अर्ज देवून सोबत वाटणीपत्र जोडून दावा मिळकत त्यांच्या नावे तसेच सर्व्हे क्रं.८९ ची जमीन रामराव पाटील यांच्यामध्ये वाटप झाल्याचे दिसून येत आहे. खरेदीपत्र (नि.क्रं.५७) चे अवलोकन केले असता, मौजे हालसी (हात्तरगा) येथील सर्व्हे क्रं.८९ ही जमीन रामराव पाटील यांनी संजीव नागोराव पाटील यांना कर्ज सारण्यासाठी विक्री केल्याचे स्पष्ट होत आहे. यावरून रामराव यांनी एकत्रात असतांना सर्व्हे क्रं.८९ ची जमीन एकत्र कुटूंबाच्या गरजेकरीता विकल्याचे सिध्द होते.

१४. मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्रं.६२) चे अवलोकन केले असता, रामराव महादवराव पाटील यांचा तारीख ०२/०७/१९९६ रोजी मृत्यु झाल्याचे नमूद केले आहे. प्र.सा.क्रं.१ अनिता हिने देखील तिच्या उलटतपासात तिचे सासरे रामराव १९९७ साली मयत झाल्याचे कथन केले आहे.

१५. प्रतिवादी तर्फे वकिलांनी मा. सर्वोच्च न्यायालय यांचा प्रकाश वि. फुलवती २०१६ ए.आय.ए.आर.(सिव्हील) १०६ या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सदर केस मध्ये स्थापीत केले आहे की, जर ता.०९ सप्टेंबर २००५ रोजी जर जिवंत मुलीचा कोपार्सनर जिवंत असेल तरच तिला सन-२००५ च्या हिंदु वारसा कायदयातील तरतुदींचा फायदा मिळेल, तिचा जन्म केंव्हाही झाला असला तरी. तसेच, ता.२० डिसेंबर २००४ पुर्वी झालेले हस्तांतरण अगर विल्हेवाट यावर कोणताही परिणाम होणार नाही त्यानंतर होणारे व्यवहार हे सदर कलमाच्या स्पष्टी करणानुसार आमलात येतील.

१६. वर नमूद न्यायतत्वानुसार प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी कोपार्सनर होण्यासाठी तिचे वडिल ९ सप्टेंबर २००५ रोजी जिवंत असणे आवश्यक आहे. तथापि, वादीचे वडिल रामराव हे ता.०२/०७/१९९६ रोजी मयत झाल्याने वादीस कोपार्सनर म्हणून हक्क अधिकार मिळणार नाहीत. तसेच हिंदु वारसा कायदा १९५६ मध्ये महाराष्ट्र राज्याने केलेली सन-१९९४ ची दुरूस्ती लागू होण्याकरीता सदर कायदयातील कलम २९ अ अन्वये वादीचे लग्न सन-१९९४ पुर्वी झालेले नसले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादीने वादीचे लग्न सन-१९९४ पुर्वी झाल्याचे कथन केले आहे. तथापि, वादीने तिचे लग्न किती तारखेला झाले, याबाबत स्पष्ट तारीख नमूद केलेली नाही. वादीने तिच्या उलटतपासात तिचे लग्न ३२ वर्षांपुर्वी झाल्याचे कथन केले आहे. यावरून वादीचे लग्न सन-१९९४ पुर्वी झाले आहे हा निष्कर्ष काढता येतो. या कारणाने वादीस सह हिस्सेधारक या सदराखाली स्वतंत्ररित्या हिस्सा मागता येणार नाही.

१७. प्रतिवादींनी जरी दावा मिळकत त्यांना वाटपात आली होती असा बचाव घेतला असला तरी, सदरचे वाटप शासकीय योजनेतील लाभा करीता केल्याचे प्र.सा.कं.१ अनिता हिने उलटतपासात सांगितल्याने फेरफार कं. ४६० अन्वये खरोखरच प्रतिवादी कं.१ व रामराव यांच्या मध्ये वाटप

झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर फेरफारामध्ये रामराव व प्रतिवादी क्रं. १ माधव यांच्यामध्ये वाटणी पत्र झाल्याचा उल्लेख नमूद आहे. तथापि, प्रतिवादींनी सदरचे वाटणी पत्र पटलावर दाखल केलेले नाही. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी महसुली कागदपत्रावरून पक्षकांरामध्ये वाटप झाले हा निष्कर्ष काढता येत नाही असे न्यायतत्व स्थापीत केले असल्याने प्रतिवादींना रामराव व प्रतिवादी क्रं.१ माधव यांच्यामध्ये झालेले वाटणीपत्र पटलावर दाखल करणे गरजेचे होते. तथापि, प्रतिवादींनी सदरचे वाटणीपत्र पटलावर दाखल न केल्याने व प्र.सा.क्रं.१ अनिता यांनी सदरची वाटणी शासकीय योजनेच्या लाभाकरीता केल्याचे कथन केल्यामुळे प्रतिवादी क्रं.१ माधव आणि रामराव यांच्यामध्ये वाटप झाले होते ही बाब प्रतिवादी सिध्द करू शकत नाही. याउलट, प्रतिवादींनी केवळ वाटपामुळे दावा मिळकत त्यांच्या मालकीची आहे असे कथन केले आहे. तथापि, प्रतिवादींनी वाटप सिध्द केले नसल्यामुळे दावा मिळकत रामरावच्या मालकीची होती हे सिध्द होते. सबब, मुद्दा क्रं.१ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्रं.४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रं.२ ३ व ५ करीता</u> :-**

१८. वर नमूद केल्याप्रमाणे वादीचे लग्न सन-१९९४ पुर्वी झाले आहे. तसेच तिचे वडिल सन-२००५ पुर्वी मयत झाले आहेत या कारणाने वादीला कोपार्सनरचा दर्जा मिळत नाही. तथापि, तिचे वडिल रामराव मयत झाले असल्याने नोशनल पार्टिशनच्या आधारावर प्रतिवादी क्रं.१ व प्रतिवादी क्रं. ५ तसेच मयत रामराव यांना समान हिस्सा म्हणजेच प्रत्येकी १/३ हिस्सा मिळेल व रामरावच्या मिळकती मध्ये हिंदु वारसा कायदा १९५६ मधील कलम ८ अन्वये वादी, प्रतिवादी क्रं.१ व प्रतिवादी क्रं.५ यांना समान हिस्सा म्हणजेच प्रत्येकी १/३ हिस्सा मिळेल एकूणच वादीला दावा मिळकतीमध्ये १/९ हिस्सा मिळण्यास वादी हिंदु वारसा कायदा,१९५६ मधील कलम ६ सह कलम ८ अन्वये पात्र आहे. सबब, मुद्दा क्रं. २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रं.३ करीता वादीचा १/९ हिस्सा असा निष्कर्ष

देवून मुद्दा कं. ५ करीता खालील आदेश देत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने दरम्यानचे उत्पन्न मागितले आहे. तथापि, त्याबाबत स्वतंत्र मुद्दा निघाला नसून पुरावा देखील देण्यात आला नाही. याकारणाने दरम्यानच्या उत्पन्नाबाबत देखील खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. दावा मिळकतींमध्ये वादीला १/९ हिस्सा असल्याचे घोषित करण्यात येते.

३. दावा मिळकत ही शेत जमीन असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील कलम ५४ अन्वये हुकूमनामा जिल्हाधिकारी, लातूर यांना अमंलबजावणीकरीता पाठविण्यात यावा.

४. दरम्यानच्या उत्पन्नाबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश २० नियम १२ (१)(क) अन्वये स्वतंत्र चौकशी करण्यात यावी.

५. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

दिनांक २१/०४/२०१६.

( शौकत एस. गोरवाडे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
निलंगा.